<u>प्रेस नोट दिनांक ०२/०५/२०१८</u>

# MIDC भोसरी पोलीस ठाणे पोलीसांची कामगिरी

## रेकॉर्डवरील गुन्हेगाराकडुन १ जबरी चोरीचा व ४ वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणले.

---

एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणेकडील तपास पथकाचे प्रभारी अधिकारी यांनी जबरी चोरीच्या गुन्हयाची कोणत्याही प्रकारची माहीती नसताना गुन्हा घडले पासुन चोवीस तासाच्या आत आरोपींचा शोध लावुन तीन आरोपी पैकी दोन सराईत आरोपी नामे **१) नरेश उर्फ प्रांजल सुनिल घनवट वय-२५ वर्षे रा. से.न. २२, संतोष बहुलेचाळ, श्रमिकनगर, आझादचौक, ओटास्कीम, निगडी, पुणे २) विशांत उर्फ विशाल संजय कटारे वय-२८ वर्षे रा. निगडी अशोक सम्राट हौ. सोसा, रुम नं. ४०५, निगडी ओटास्कीम पुणे** यांना अटक करुन त्यांच्या कडुन एम आय डी सी भोसरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि.न.१३८/२०१८ भा द वि कलम ३९२,३४ प्रमाणे दाखल गुन्हयातील जबरदस्तीने चोरी करुन घेवून गेलेली ५०,०००/- रुपये किमतीची हिरो होंडा पॅशन प्रो व गुन्हा करते वेळी वापरलेली २०,०००/- रुपये किमतीची हिरो होंडा पॅशन मोटर सायकल असा एकुण ७०,०००/- रुपये किमतीच्या दोन मोटरसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

तसेच एम.आय.डीसी पोलीस स्टेशन चे अभिलेखवरील सराईत गुन्हेगार नामे १) निलेश सुनिल पवार वय-२३ वर्षे रा. आदर्शनगर, मोशी,पुणे २) करन कुमार जाधव वय- २३ वर्षे रा. वडगाव रोड, विश्रांतवडाचे बाजूला, आळंदी, पुणे यांना एम आय डी सी भोसरी पोलीस स्टेशन गुन्हा रजि.न.१३६/२०१८ भा द वि कलम ३७९ मध्ये अटक करुन त्यांच्याकडुन पिंपरी पोलीस स्टेशन कडील दोन वाहन चोरीच व विश्रांतवाडी पोलीस स्टेशन कडील एक वाहनचोरीचा असे एकुण ४ गुन्हे उघडकिस आणुन त्यांच्याकडुन एकुण १,३०,०००/- रुपये किमतीच्या चार मोटरसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

सदरची कामगिरी ही मा. अप्पर पोलीस आयुक्त श्री. प्रदिप देशपांडे, मा.पोलीस उपायुक्त, श्री गणेश शिंदे तसेच मा.सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. सतीश पाटील यांचे मार्गदर्शनाखाली MIDC भोसरी पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. भिमराव शिंगाडे, तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक रावसाहेब बांबळे, पोलीस हवालदार अजय भोसले रविंद्र तिटकारे, पोलीस नाईक किरण काटकर, पोलीस शिपाई विजय दौंडकर, अमोल निघोट नवनाथ पोटे व करन विश्वासे, विशाल काळे, यांनी केली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रावसाहेब बांबळे हे करीत आहेत.

---